शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी

# ई-प्रशिक्षक

प्रयोगशील प्रतिभासंपन्न शिक्षकांसाठीचे ई-मासिक

राष्ट्रीय सौर अग्रहायण-पौष शके १९४४
डिसेंबर २०२२
वर्ष : ९ अंक : १२





# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

गेल्या पंधरवड्यात एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला गेलो होतो. प्रकाशनानंतर ते विकत घेऊन सलग वाचले. सामाजिक गरज आणि त्याला प्रतिसाद देण्याची एका व्यक्तीची आंतरिक उर्मी यातून उभ्या राहिलेल्या शैक्षणिक प्रयोगाची एका तपाची कहाणी. आदरणीय विशुद्धानंदा तथा भारती ठाकूर यांनी सांगितलेली 'गोष्ट नर्मदालयाची'.

'नर्मदालय' हे गेल्या बारा वर्षांत विविध अंगांनी विकसित होत गेलेलं एक समग्र शिक्षण केंद्र. शैक्षणिक केंद्राच्या जीवनशिक्षणाचा अभ्यासक्रम विकसित करण्याची धडपड या शैक्षणिक प्रयोगांच्या गोष्टीत सांगितली आहे. एका बाजूला पोषण आहार मिळाला तर मूल शिकते होईल यासाठी राबावलेलेले उपक्रम तर दुसऱ्या बाजूला पाठ्यपुस्तकी अभ्यासक्रमाशी जीवनशिक्षण अभ्यासक्रम यांचे शिकणाऱ्याच्या क्षमता आणि गरजा यांची सांगड घालणारे उपक्रम या गोष्टीत मांडले आहेत. पुस्तकात या शैक्षणिक प्रयोगातील पुढील स्वप्नांचे दर्शन होते. जसे नवीन शैक्षणिक धोरणानुसार आता 'व्यवसाय कौशल्य' हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट झालाय; पण खेडोपाडी त्यासाठी लागणारी यंत्रणा अथवा ते शिकवायला लागणारी प्रशिक्षित मंडळी उपलब्ध नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. हे लक्षात घेऊन नर्मदालय आज फिरते शिक्षण केंद्र 'कौशल्य रथ' या नवीन प्रयोगाची तयारी करत आहे.

खरंतर प्रत्येक शाळेची तिची अशी एक कहाणी असते, पण अगदी मोजक्याच शैक्षणिक प्रयोगांची गोष्ट प्रयोग करणारे सर्वांसमोर मांडतात. शैक्षणिक प्रयोगांच्या नोंदी हे नवीन शैक्षणिक पद्धती विकसित होण्याच्या दिशेने पहिले पाऊल असते. शिक्षकांनी आपल्या वर्गातील, शाळेतील आपल्या प्रयोगांची गोष्ट सांगितली पाहिजे.

आपण केलेल्या शैक्षणिक प्रयोगांची गोष्ट आपल्या शिक्षक मित्रांसमोर मांडण्याचे व्यासपीठ म्हणजे ई प्रशिक्षक. आपल्या नर्मदालयाची गोष्ट जरूर आमच्यापर्यंत पोचवा.

सस्नेह,
**प्रशांत दिवेकर**

**संस्थापक संपादक**
कै. विवेक पोंक्षे

**संपादक**
प्रशांत दिवेकर

**सहाय्यक संपादक**
ऋतुजा देशमुख

**अक्षरजुळणी व मांडणी**
सोहम क्रिएशन
८६०५५६७६५७

# भारतीय कला समजून घेताना

प्राचीन भारतात स्थापत्य, चित्र, शिल्प, दैनंदिन वापरातील अनेक वस्तू, माती-कापड-काच-धातू या माध्यमात बनवलेल्या वस्तू हीच भारताची फाईन आर्ट म्हणता येईल. फाईन आर्ट म्हणजे केवळ कलादालनात लावलेली चित्रे व शिल्पे नव्हेत. फाईन आर्टची ही व्याख्या इंग्रज इथे आल्यानंतर रूढ झाली. फाईन आर्ट आर्ट म्हणजे खरंतर कोणत्याही माध्यमात तयार केलेल्या कलाकृती. भारताची किंवा कोणत्याही देशाची फाईन आर्ट ही त्या देशातील लोककला संस्कृतीचा परिपाक असते. त्या त्या देशात वर्षानुवर्षे फुललेल्या कला हीच तिथली फाईन आर्ट म्हटली गेली पाहिले. चित्र-शिल्प कलादालनात प्रदर्शित व्हायच्या आधी प्राचीन भारतीय कलेचे स्वरूप वर म्हटले तसे माणसाच्या जगण्याशी थेट जोडलेले होते. धर्मातील विचारांचाही त्यावर पगडा होता. हिंदू, बौद्ध, जैन लेण्यांची निर्मिती ही त्यातूनच झालेली दिसते. कोणताही भव्य असा स्थापत्याचा प्रकार असेल किंवा मंदिरे, स्तूप, लेणी असतील अनेक राजवंशांनी तसेच व्यापारी, शेतकरी अशा समाजातील अनेक लोकांनी दिलेल्या दानातून या कलाप्रकारांची निर्मिती झालेली दिसते. स्थापत्याच्या नमुन्यांबरोबरच वस्तुसंग्रहालयात दिसणाऱ्या अनेकविध वापरातल्या गोष्टी, अलंकारिक वस्तू, दागिने, नाणी, मातीची भांडी, प्राचीन काळातील हस्तलिखिते-पोथ्या त्यांची भाषा-लिपी, burials दफनांच्या उत्खननात मिळालेल्या वस्तू व अवशेष या सगळ्यांचा उपयोग इतिहासाचा अभ्यास करताना, इतिहासाची पुनर्रचना करताना होतो. या वस्तू मुलांना दाखवण्याआधी इतिहासाचा कालानुक्रम शतकांच्या परिभाषेत का होईना काहीसा परिचयाचा असेल तर समजायला अधिक सोपे जाते. प्राचीन काळातील इतिहासाचा अभ्यास करताना मानव जसा उत्क्रांत होत गेला याची शास्त्रीय मीमांसा महत्त्वाची ठरते तसंच त्याची समाजशास्त्रीय मीमांसाही उपयोगी पडते. त्यामुळे म्युझिअम्समधील प्राचीन वस्तू, उत्खननात सापडलेल्या गोष्टींबद्दल बोलताना निदान या विषयाची तोंडओळख तरी हवी.

इतिहासाच्या कालक्रमानुसार इसवी सनापूर्वी किंवा इसवी सनात भारतात साधारण काय घडले? माणूस व समाज म्हणून उत्क्रांत होण्याचे अगदी

ढोबळ टप्पे आपल्या स्मरणात असले तर विद्यार्थ्यांच्या अनेक शंकांची उत्तरे आपण देऊ शकतो. साधारणपणे वस्तुसंग्रहालयात मुलांना घेऊन जायचे असेल तर प्राचीन काळातील वस्तूचे नाव, वस्तूचे माध्यम म्हणजे ती दगड, लाकूड, काच, माती इत्यादिपैकी कोणत्या माध्यमात केली आहे? particular अशा काळात त्या वस्तूचा उपयोग कशासाठी होत होता? काळ बदलला तर त्या माध्यमात, उपयोगात फरक पडला का? यावरून लोकांचे राहणीमान, समाजजीवन कसे होते याचीही माहिती कळू शकते.

काळानुसार नाणी, मंदिरे, देवदेवतांची शिल्पे याच्या iconography तही फरक पडलेला दिसतो. iconography म्हणजे एखादी देवता किंवा मूर्ती यांची ठराविक अशी प्रतिमा, जी आणि जशी निर्माण होते. शंकराची मूर्ती असेल तर किती हात, किती आयुधे? गळ्यात काय? जटांमध्ये काय? कोणत्या स्थितीत मूर्ती आहे? सोबत कोण कोण दाखवले आहेत? या प्रतिमा त्या देवतेला लागून येणाऱ्या गोष्टींचे प्रतीक म्हणून येतात. उदाहरणार्थ, सुरुवातीच्या काळात बुद्धाच्या प्रतिमेचे पूजन होत नव्हते. तर बुद्धाचे अस्तित्व अमूर्तपणे दाखवले जाऊन त्याच्या प्रतीकांची पूजा होत असे; म्हणजे बोधी वृक्ष, बुद्धाचे पाय, स्तूप यांची पूजा होत होती. त्यामुळे बुद्धाची प्रतिमा मूर्तरूपात असेल तर ती बरीच नंतरच्या काळातील म्हणजे गुप्तकालीन व नंतरची असेल. अशी निरीक्षणे नोंदवता येतात. बुद्ध प्रतिमांचे अंकन गौतम बुद्धाच्या आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या घटनांवर आधारित असते. त्यामुळे बौद्ध धर्माच्या संबंधित मूर्तींचे निरीक्षण



करताना या बाबी ध्यानात घ्यायला हव्यात. त्यामुळे म्युझिअम्समधील नमुने बघताना त्याची माहिती काळजीपूर्वक वाचावी म्हणजे इतिहासातील अनेक नोंदी, परस्पर संबंध उलगडत जातो. कोणत्या काळात कोणत्या धर्माचे, पंथाचे प्राबल्य होते? कोणत्या देवतांची पूजा त्या त्या काळात होत होती? याचे संदर्भ थोडे डोळसपणे आकलन केले तर होते. त्या त्या काळात शस्त्रे, नाणी कशी होती याची माहिती देखील मिळते. कोणत्या तंत्राने ती बनवली जात असतील? याचीही माहिती देणारी अनेक पुस्तके आहेत, इंटरनेटवर ही माहिती आज सहज उपलब्ध आहे. लेणी पाहायला जाताना लेण्यांचा काळ, त्यावेळी कोणत्या राजवंशाची सत्ता होती? लेण्यांचा उपयोग कशासाठी होत होता? लेणी हिंदू, बौद्ध, जैन कोणत्या धर्माची आहेत? स्थापत्य, शिल्प कसे आहे? त्या लेण्यांचा उपयोग कशाकशासाठी केला जात होता? विहार, चैत्यगृह अथवा मंदिर, पाण्याची टाकी, सामूहिक प्रार्थनेच्या जागा याची माहिती करून घेतली तर त्या ऐतिहासिक स्थळाची माहिती मुलांना आपण देऊ शकतो.

हिंदू देवदेवतांची शिल्पे पाहताना त्या देवतेशी निगडित अनेक गोष्टींचे अंकन शिल्पकाराने मूर्तीत केलेले असते. देवतेची शस्त्रे, देवतेचा परिवार, देवतांच्या संबंधात घडणारे प्रसंग, त्या प्रसंगातील इतर पात्रे अशा अनेक गोष्टी एखाद्या शिल्पात बघायला मिळतात. त्यामुळे शिव किंवा विष्णुसारख्या देवतांचे अंकन अनेक रूपातून केलेले आपल्याला दिसते. त्यामुळे प्राचीन काळातील मूर्तींचा अभ्यास करताना या गोष्टी नीट बघायला हव्यात. कोणत्या पोजमध्ये स्थितीत मूर्ती आहे? उदा. योगमुद्रा, ध्यानमुद्रा इत्यादी विशिष्ट स्थिती त्यांनी घातलेली वस्त्रे, अलंकार, कोरीव कामाची पद्धत, दगडाचा प्रकार, शिल्पकलेच्या तंत्राचे कसब, त्यावर क्वचित असणारा कोरीव लेख अशी अनेक निरीक्षणे शिल्प किंवा मूर्ती पाहताना करता येतात.

मंदिरे किंवा स्तूप पाहायला जायच्या आधी त्याबद्दल थोडी माहिती घेऊन गेलो तर काय पाहणार आहोत? याची पूर्वकल्पना येते. मंदिरस्थापत्य विकसित होतानाच्या काळात भारतात अनेक राजवटीत विविध काळात अनेक बदल झालेले दिसतात. कोणत्या राजवटीत मंदिर बांधले गेले? सामान्यतः उत्तर भारतात नागरशैलीतील व दक्षिण भारतात द्राविड शैलीतील मंदिरे दिसून येतात. मंदिरांचे कळस कसे व कोणत्या प्रकारचे आहेत? त्यावर मंदिराची शैली कळते.

मंदिर ही संपूर्णतः एकसंध रचना धरली तर शिखर, स्तुपी, मंदिराचा





गाभारा (गर्भगृह), ललाटपट्टी, द्वारशाखा, अंतराळ, अर्ध मंडप, गूढ मंडप (बंदिस्त मंडप ) मुख्य मंडप, सभामंडप, नट मंडप, दक्षिणेत गोपुरे असे अनेक भाग असतात. मंदिरावरील कोरीव काम कसे आहे? कोणत्या दगडात केले आहे? मंदिर एकपाषाणीय आहे की नाही? कोणत्या मुख्य देवतेचे ते मंदिर आहे? कोणत्या काळात, कशाप्रकारे शिल्पकलेचा विकास कसा झालेला होता? अशी अनेक निरीक्षणे करता येतील. सोबतच्या आकृतीत मंदिरासंबंधी काही माहिती आपण बघू शकाल. लेखाच्या शेवटी काही पुस्तकांची यादीही सोबत दिली आहे.

स्तूप हा बुद्ध, बुद्धाचे शिष्य, बौद्ध भिख्खू यांच्या स्मरणार्थ बांधले जातात. त्या स्तुपात वरच्या बाजूला हर्मिकेमध्ये या भिख्खूंची आठवण म्हणून पूर्वी त्यांच्या अस्थी, केस, भिक्षेचा वाडगा, दात इ. वस्तू ठेवल्या जात. स्तूपाचा आकार डोमसारखा असतो. त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी जागा असते. चैत्यगृहातील स्तूपाच्या समोर ध्यानधारणा इ. केली जाते.

प्राचीन काळातील भारतीय कलेचे नमुने म्हटलं तर आपण वर पाहिली ती सगळी उदाहरणं यादृष्टीने विचारात घेण्यासारखी आहेत. महाराष्ट्र बोर्डाच्या, एनसीइआरटीच्या इतिहासाच्या क्रमिक पुस्तकांत कोणकोणते विषय अभ्यासाला आहेत, यावरून आपण त्या त्या इयत्तेच्या मुलांना अभ्यास सहलीसाठी कुठे नेऊ शकतो याचा विचार करता येईल. आपापल्या गावातील जुने वाडे, मंदिरे, किल्ले, जुन्या विहिरी, इतर धर्मांची जुनी प्रार्थनास्थळे, पुराण वस्तुसंग्रहालये, Coin Collectors, इतिहास- पुरातत्त्व विषयात काम करणारे तज्ज्ञ-त्यांच्याशी

मुलांच्या गप्पा इत्यादि कोणत्याही स्वरूपाचे कार्यक्रम आपण या विषयासंदर्भात विचार करून ठरवू शकतो.

ऐतिहासिक स्थळांच्या, वस्तूंच्या निरीक्षणातून काळानुसार मानवी जगण्यात झालेला बदल, कलेच्या तंत्रातील बदल, धर्म-संस्कृती, राजकारण, अर्थव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, भूगोल, व्यापार, भाषा-लिपी यांच्यात विकास किंवा बदल कसकसा होत गेला याचा अंदाज येऊन भूतकाळ आणि वर्तमानकाळातील त्याचा परस्परसंबंध जोडायला मदत होते. पुराव्यांच्या आधारे नवीन तर्क बांधता येऊ शकतात.



**✻ उपयोगी ठरतील अशी काही पुस्तके ✻**

**लेखक – गो.बं. देगलूरकर**

✻ मंदिर कसे पाहावे

✻ प्राचीन भारत – इतिहास व संस्कृती

✻ शिवमूर्तये नम:

✻ विष्णुमूर्तये नमस्तुभ्यम्

**लेखक – मंजिरी भालेराव, कल्पना रायरीकर**

✻ महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार – शिलालेख व ताम्रमट

✻ Ancient India from the stone age to the 12th century by Upinder Singh

**– सौ. अदिती जोगळेकर-हर्डीकर**

**Email ID - adjos28@gmail.com**

✻✻✻

# वाचन चळवळ

‘वाचाल तर वाचाल’ असं म्हटलं जातं, पण असं असलं तरी कशासाठी वाचायचं, कसं वाचायचं आणि काय वाचायचं हे कुणी सांगत नाही. त्याचबरोबर वाचनातून आनंद कसा मिळवायचा, स्वतःला समृद्ध करत कसं न्यायचं हेसुद्धा अनेकांना समजतंच असं नाही. या सवयी शालेय वयातच मुलांना जाणीवपूर्वक लावल्या तर त्यांच्यामध्ये वाचनाची, पुस्तकांची आवड निर्माण होऊ शकते. त्याचा आनंद ती घेऊ शकतात. नवनवीन विषय समजणे, लेखकांशी जोडलं जाणं यातला आनंद त्यांना मिळू शकतो आणि या सगळ्यामधूनच त्यांचं व्यक्तिमत्त्व संपन्न होत जातं. फक्त हे कुणीतरी एक मिशन म्हणून करण्याची गरज असते. ज्ञानप्रबोधिनी सोलापूर केंद्राच्या ग्रंथालयाच्या ग्रंथपाल सौ. माधुरीताई बारपुते यांनी मुलांवर हे वाचनसंस्कार घडवण्यासाठी केलेले वेगवेगळे प्रयत्न आणि त्यातून निर्माण झालेल्या फलिताविषयी जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी साधलेला हा संवाद.

**प्र. नमस्कार ताई. स्वागत आहे तुमचं.**

नमस्कार.

**प्र. ज्ञानप्रबोधिनीमध्ये तुमच्या कामाची सुरुवात कशी झाली ?**

१९९५ पासून मी ज्ञानप्रबोधिनीमध्ये ग्रंथपाल म्हणून काम करते. सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमधून B.Sc., शिवाजी विद्यापीठातून B.Lib. झालं. त्यानंतर sociology मध्ये M.A. पूर्ण केलं आणि आता जवळजवळ २७ वर्षं झाली इथे कामाला सुरुवात करून.

**प्र. ग्रंथालयाची पहिली स्थिती कशी होती ? आता कोणते बदल झालेले आहेत ?**

सुरुवातीला हे ग्रंथालय एका छोट्याशा खोलीमध्ये होतं आणि बंदिस्त प्रकारात चालवलं जायचं. साहित्यसम्राट न. चि. केळकर ग्रंथालयांना ‘ज्ञानाची सदावर्तं’ म्हणतात आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ग्रंथालयाला खरंच ‘ज्ञानाचे सदावर्त’ करायचं असेल तर ते मुक्तद्वार पद्धतीने चालवलं पाहिजे असा विचार करून मी कामाला सुरुवात केली. त्यानंतर साधारण ६-८ महिन्यातच हे ग्रंथालय मुक्तद्वार केलं गेलं. इथे विद्यार्थी स्वतः पुस्तकं हाताळतात. त्यामुळे मुखपृष्ठ आणि पुस्तकामध्ये असलेली चित्रं बघून त्यांना पुस्तकांबद्दल आकर्षण वाटायला लागतं

आणि ते पुस्तक वाचनाकडे वळतात.

**प्र. पुस्तकांची मांडणी करताना काही वेगळा विचार केला आहे का?**

पुस्तकांची मांडणी विषयांप्रमाणे केलेली आहे. त्याचबरोबर मुलांच्या वयाचा विचार करूनही मांडणी केलेली आहे. शिशू आणि प्राथमिक गटाच्या मुलांच्या उंचीचा विचार करता गोष्टी, चित्रं, बडबडगीतं अशी पुस्तकं rack मध्ये खालच्या बाजूला ठेवलेली आहेत. ध्वनी निर्माण करणारी, स्पर्शज्ञानाचा अनुभव देणारी पुस्तकंही आहेत.

साधारणपणे कथा-कादंबऱ्या, कविता, नाटक, स्त्री-चरित्र, संशोधक, विज्ञान, कुमार साहित्य, संत चरित्र, ऐतिहासिक, संस्कृत साहित्य, पालकत्व, व्यक्तिमत्त्व विकास, चरित्र, पौराणिक, संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तकं, पूरक पुस्तकं, शिशू अध्यापिकांसाठी अभ्यास, इंग्लिश पुस्तकं, संगणक, अध्यात्म अशा जवळपास २० प्रकारांप्रमाणे पुस्तकांची मांडणी केलेली आहे. नवीन आलेली पुस्तकं, मासिकं ग्रंथालयाच्या दर्शनी भागामध्ये stand मध्ये ठेवलेली असतात, जेणेकरून ग्रंथालयात आल्यावर लगेचच ती दृष्टीस पडतील.

**प्र. पुस्तकं निवडताना कोणता विचार करून निवडता?**

विद्यार्थी, अध्यापकांच्या मागणीचा विचार केला जातो. नवीन आलेल्या पुस्तकाचं परीक्षण वाचूनही पुस्तकांची निवड होते. एखादं पुस्तक कोणत्या वयोगटासाठी उपयोगी पडेल असाही विचार होतो. शालेय उपक्रमांशी, अभ्यासक्रमाशी निगडित पुस्तकंही विचारात घेतली जातात. दैनिकात, मासिकात, फेसबुकवर, काही गटात पुस्तकांचा सारांश येतो. त्यातून नवीन उपयुक्त पुस्तकं समजतात. वाचकांनी एखाद्या विषयावर पुस्तक मागितलं आणि ते ग्रंथालयात नाही मिळालं तर त्या विषयावरची पुस्तकं मी गुगलवर शोधून मागवते. स्थानिक विक्रेते त्यांच्याकडे नवीन आलेल्या पुस्तकांची यादी पाठवतात. त्यातूनही पुस्तक निवडते.

**प्र. मुलांमध्ये ही वाचन अभिरुची समृद्ध करण्यासाठी ग्रंथालयाकडून कोणकोणते उपक्रम योजले जातात?**

दरवर्षी ग्रंथालयाकडून वाचकवीर योजना, आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शनांना भेटी, ग्रंथालय पुस्तक ठेव योजना, पुस्तक पेटी, वर्ग ग्रंथालय, वाचू आनंदे शिबिर असे बरेच उपक्रम घेतले जातात.

इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी वर्षभरासाठी वर्गशिक्षकाकडे पुस्तक

पेटी दिली जाते. रिकाम्या तासाला या पुस्तकाचं वाचन विद्यार्थी करतात. त्याशिवाय तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एक तास ग्रंथालयाचा असतो.

**प्र. वाचकवीर योजना काय आहे? कशा पद्धतीने राबवता?**

प्रत्येक इयत्तेला किमान पृष्ठांचं उद्दिष्ट दिलं जातं. ज्याचं उद्दिष्ट पूर्ण झालं आहे, त्यांची गटचर्चा घेतली जाते. वाचलेल्या पुस्तकांबद्दल विद्यार्थी या चर्चेमध्ये बोलतात.त्यांची ग्रंथालयाची वहीसुद्धा असते. वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांविषयी ते या वहीमध्ये लिहितात. ज्या विद्यार्थ्यांनी याची पूर्तता केलेली असते त्यांना पारितोषिक दिलं जातं. पण प्रत्येक तुकडीतून सर्वात जास्त वाचन केलेल्या दोन विद्यार्थ्यांना विशेष बक्षीस दिलं जातं. इयत्तेनुसार विद्यार्थ्यांनी वाचावेत असे साहित्यप्रकारही ठरवून दिलेले असतात.

**प्र. तुम्ही साहित्यप्रकार ठरवून देण्यामागे काय कारण आहे?**

खरं तर सुरुवातीला मुलांना त्यांच्या आवडीची पुस्तकं वाचायला सांगितली होती. पण नंतर असं लक्षात आलं की, मुलं कथा-कादंबऱ्या, साहसकथा वाचतात पण प्रवासवर्णन, कविता, चरित्र-आत्मचरित्र, माहितीपर अशा साहित्याकडे फारसं वळत नाहीत.

वेगवेगळ्या प्रकारच्या सकस वाचनातून विद्यार्थ्यांच्या जीवनाला निश्चितच चांगलं वळण लागेल असं वाटतंय. या संवेदनशील वयात केलेलं वाचन त्यांना चौकस बनवतं. इतरांना मदत करावी, मैत्री जपावी,आत्मसन्मान, अभिमान, सत्य, धैर्य या गुणांचा त्यांना आदर वाटावा यासाठी हे साहित्यप्रकार त्यांनी वाचावेत म्हणून अशा प्रकारची चांगली पुस्तकं त्यांच्या वयोगटाचा विचार करून सुचवली जातात. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मुलांनी या यादीतलीच पुस्तकं वाचली पाहिजेत असं काही बंधन नाही पण प्रत्येक प्रकारातलं त्यांच्या आवडीचं किमान एक तरी पुस्तक त्यांनी वाचावं असं सुचवलं जातं.

**प्र. पुस्तक परिचय स्पर्धेचं स्वरूप कसं आहे?**

आपल्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावं म्हणून आपण प्रयत्न करतोच आहोत पण अन्य शाळेतील विद्यार्थ्यांनी सुद्धा वाचावं यासाठी काही करता येईल का असा विचार झाला आणि ही पुस्तक परिचय स्पर्धा आणि वाचू आनंदे शिबिर यांचं आयोजन करायला सुरुवात झाली. सोलापुरातल्या शाळांना स्पर्धेचं पत्रक पाठवलं जातं. यामध्ये इयत्तेनुसार गट केलेले असतात.

गटांसाठी पुस्तकं सुचवली जातात. त्यातलं त्यांच्या आवडीचं कोणतंही एक पुस्तक वाचून त्यांनी त्याचा परिचय लिहिणं अपेक्षित असतं. दरवर्षी १३०–१४० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होतात. स्पर्धेसाठी निवडलेली पुस्तकं अन्य शाळांमध्ये उपलब्ध नसतील तर गरज असल्यास ज्ञान प्रबोधिनीतर्फे ती उपलब्ध करून दिली जातात.

विद्यार्थ्यांच्या पुस्तक परिचय लेखनाचं परीक्षकांकडून मूल्यमापन झाल्यानंतर प्रसिद्ध साहित्यिकांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम होतो. संस्कारकथा, थोर व्यक्तींची चरित्रं, विज्ञानावरील पुस्तकं, पारितोषिकाच्या रूपात दिली जातात. विद्यार्थ्यांच्या वाचनाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने सर्व सहभागी विद्यार्थांना पुस्तक आणि प्रमाणपत्र दिले जाते.

**प्र. वाचू आनंदे शिबिराबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता आहे मला.**

२०१०च्या उन्हाळ्याच्या सुट्टीत पहिलं वाचन शिबिर झालं. या शिबिरात कथाकथन, काव्यवाचन, नाट्यवाचन, शब्दकोडी, लेखक कवींच्या मुलाखती, क्षेत्रभेटी, e-book reading अशी सत्रं घेतली जातात. वाचन कौशल्य कसं आत्मसात करायचं, वाचन वेग कसा वाढवायचा, संदर्भ ग्रंथ कसे हाताळायचे याबद्दल मार्गदर्शन केलं जातं. पाच दिवस दररोज साधारण तीन तास हे शिबिर घेतलं जातं. वाचनाची खोली वाढवण्याच्या दृष्टीने हे शिबिर मोलाचं ठरतं.

**प्र. विद्यार्थ्यांबरोबरच अध्यापक आपलं अध्यापन सखोल, प्रभावी व्हावं यासाठी ग्रंथालयाचा किती आणि कसा उपयोग करतात?**

निश्चितच अध्यापकही चोखंदळ, सजग वाचन आणि संदर्भशोध यासाठी ग्रंथालयातल्या पुस्तकांचा वापर करतात. भाषा आणि इतिहासच नाही तर गणित, शास्त्र, भूगोल, संगणक, कला, संगीत या विषयांसाठीही अध्यापक ग्रंथालयातल्या संदर्भग्रंथांचा वापर करतात. विज्ञानाचे अध्यापक प्रयोग, शास्त्रज्ञांची चरित्रं यासाठी वापर करतात. शिशुशाळेचे शिक्षकही वेगवेगळे खेळ, आहार, आरोग्य या संदर्भातील पुस्तकं अभ्यासतात.

**प्र. वाचकवीर, पुस्तक परिचय हे तर मोठे उपक्रम आहेतच. याशिवाय इतर उपक्रमांबद्दल काय सांगाल?**

७वी च्या विद्यार्थ्यांसाठी वर्गग्रंथालय चालवलं जातं. आठवड्यातून एक दिवस ठरवून दिला जातो. त्यादिवशी ७वी च्या विद्यार्थ्यांना 'छात्र प्रबोधन'चे

अंक आठवड्यासाठी दिले जातात. दर आठवड्याला ठरलेल्या वारी विद्यार्थी अंक बदलून घेतात. पुस्तक पेटी योजनेमध्ये ३री-४थी च्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकं वर्षभरासाठी दिली जातात. ग्रंथालयाच्या पुस्तकांबरोबरच या अंकांचा लाभही विद्यार्थ्यांना मिळतो. याशिवाय शहरामध्ये बरीच पुस्तक प्रदर्शनं असतात. त्यांनाही आवर्जून भेटी दिल्या जातात.

विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांसाठीही पुस्तक परिचय स्पर्धा असतात. आपल्या प्रशालेतल्या अध्यापकांबरोबरच अन्य शाळांमधल्या अध्यापकांसाठीही ह्या स्पर्धा घेतल्या जातात.

याबरोबरच पालकांना, साधकांना ग्रंथालयाचं सभासदत्व दिलं जातं. सर्व विभागांच्या बैठकीत पालकांना ग्रंथालयाबद्दल आवर्जून सांगितलं जातं.

**प्र. Lockdown च्या काळात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कसा होता? या काळासाठी काही विशेष योजना होत्या का?**

सुरुवातीचे काही महिने खूपच अल्प प्रतिसाद होता. मग विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे कसं वळवता येईल असा विचार झाला आणि पुस्तक पेटी योजना सुरु केली. विद्यार्थ्यांच्या वयोगटाप्रमाणे ६-६ पुस्तकांचा संच केला. वेगवेगळ्या साहित्यप्रकारांचा यामध्ये समावेश होता. विद्यार्थी ही पेटी घरी घेऊन जात असत आणि साधारण १५ दिवसांनी बदलून घेत असत.

**प्र. खरंच स्तुत्य उपक्रम आहेत सगळेच. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध माध्यमांच्या सध्याच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांबद्दल प्रेम, गोडी कमी झाली आहे असं जाणवतं का?**

अगदी खरं आहे. चित्रपट, दूरदर्शन, मोबाईल, व्हिडिओ गेम, इंटरनेट यांसारख्या करमणुकीच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या अभिरुचीला विचित्र वळण लागलेलं आहे. मेंदू ठप्प करणारी ही करमणूक मानसिक संतुलन बिघडवायला कारणीभूत ठरत आहे. पुस्तकांच्या वाचनाने मनन प्रक्रियेला, विकासाला गती मिळते, म्हणून e-book हाही पर्याय ठेवला आहे. संगणकावर, मोबाईलवरही आता विद्यार्थी जवळजवळ ३९५ पुस्तकं वाचू शकतात. याचंही स्वरूप विद्यार्थ्यांच्या स्पर्धेप्रमाणेच आहे.

मुलं अनुकरणप्रिय असतात. आई-बाबा वाचत असतील तर मुलंही पुस्तकाकडे लवकर वळतात, म्हणून विद्यार्थ्यांना घरातही वाचनासाठी पूरक वातावरण मिळावं यासाठी सगळ्याच विभागामधल्या पालकांना ग्रंथालयाचं

सभासदत्व दिलं जातं.

**प्र. ग्रंथालयाला पूरक असलेलं वातावरण कसं निर्माण होतं?**

ग्रंथालयामध्ये शांतता महत्त्वाची असते. इथे आलेली व्यक्ती वाचनासाठी प्रवृत्त व्हावी म्हणून मी स्वतः वाचन करत असते. पुस्तकांची काळजी घेणे, त्यांची स्वच्छता राखणे, योग्य अवस्थेत ती ठेवणं आणि वाचकांची गैरसोय होऊ नये म्हणून काळजी घेणे यासाठी स्वतः शिस्त लावून घेतली की विद्यार्थीही अनुकरण करतात.

**प्र. तुम्ही कोणत्या प्रकारची पुस्तक वाचता? नवीन पुस्तकाचा शोध कसा घेता?**

मी विशेषतः चरित्र-आत्मचरित्र वाचते, आपल्याकडे सर्व वयोगटातल्या वाचकांकरिता मासिकं, पुस्तकं आहेत. वाचक; मग ते विद्यार्थी असोत किंवा पालक असोत. काय वाचू हा प्रश्न ते विचारतात. त्यांच्या गरजांप्रमाणे, वयाचा, आवडीचा विचार करून त्याप्रकारे त्यांना पुस्तकं सुचवली जातात. त्याआधी पुस्तक मला चाळावं, वाचावं लागतं. नवीन पुस्तक आल्यावर त्या पुस्तकात काय आहे ते मी आवर्जून बघतेच.

**प्र. जवळपास २७ वर्षं तुम्ही ग्रंथपाल म्हणून काम करत आहात? वाचनाच्या आवडीमध्ये होत जाणारा बदल तुम्ही पाहता आहात. येणाऱ्या पिढीचा विचार करता भविष्यकालीन योजना कोणत्या असतील?**

मुलांना कवितांची गोडी लागण्यासाठी काव्य वाचनाचा कार्यक्रम, ज्येष्ठ कवींच्या भेटी घेण्याचा विचार आहे. आपल्या शाळेप्रमाणेच इतर शाळांनी वाचकवीर योजना सुरू करावी असा प्रयत्न आहे.

**प्र. एकुणातच वाचकवीर, पुस्तकपरिचय या योजना किती सफल झाल्या असं वाटतंय?**

खरंतर वाचनाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करायची हे निरंतर चालणारं काम आहे, पण आत्तापर्यंतच्या कामामधून निश्चितच समाधान मिळालेलं आहे. विद्यार्थ्यांचं ग्रंथालयात येण्याचं प्रमाण वाढलेलं आहे. विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढलेली आहे. लेखन कौशल्यातही सुधारणा दिसून येताहेत. स्मरणशक्ती, वाचनवेग यात बदल झाला आहे. मुलांमध्ये प्रेम, जिव्हाळा, जिद्द, खिलाडूपणा, प्रयोगशीलता यासारखे गुण वृद्धिंगत झाल्याचं दिसून येतंय आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सकारात्मक बदल झालेले दिसतात. माजी विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, नोकरी व्यवसाय करत असताना

वाचनाची आवड जोपासण्यासाठी पुन्हा आपल्या ग्रंथालयाकडे येतात. याचंही समाधान आहे.

**प्र. ग्रंथपाल म्हणून आनंद देणारा, समाधान वाटणारा क्षण कोणता?**

२०१५ साली विवेकानंद प्रतिष्ठान, जळगावतर्फे राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत, 'शालेय शिक्षणातील उपक्रमशीलता' या विषयांतर्गत आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा या विषयावर शोधनिबंध सादर केला. या शोधनिबंधाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.या निमित्ताने हा उपक्रम बऱ्याच शाळांपर्यंत पोहोचवता आला. राष्ट्रीय शिक्षा अभियानांतर्गत,जिल्हास्तरीय ग्रंथ महोत्सव २०१६-१७ या वर्षी संपन्न झाला. या ग्रंथ महोत्सवात उत्तम ग्रंथालय स्पर्धेत आपल्या ग्रंथालयाला प्रथम क्रमांक मिळाला. याचा विशेष आनंद वाटतो.

**प्र. ग्रंथपाल व्यक्ती म्हणून कशा घडत गेलात?**

घरातून वाचनासाठी पोषक वातावरण मिळाल्यानं लहानपणापासूनच वाचनाची गोडी लागली, पण वाचनाची भूक भागवण्यासाठी पुस्तकं मिळत नव्हती. वाचनातून मिळणारा आनंद अमाप होता. त्यामुळे मग B.Sc. झाल्यावर आता करिअरचा विचार करता कोणता अभ्यासक्रम निवडू यात असा विचार करता जाणीवपूर्वक B.Lib. केलं, ज्यायोगे आपल्याप्रमाणे इतरांनाही वाचनाची गोडी लावता येईल, पुस्तकं उपलब्ध करून देता येतील. ज्ञानप्रबोधिनीमध्ये येण्यापूर्वी चार वर्षं उमा महाविद्यालय, पंढरपूरमध्ये काम केलं आहे, पण ग्रंथपाल म्हणून घडण झाली ती प्रबोधिनीतच. वाचनाचा मनुष्यघडणीमध्ये चांगला उपयोग होऊ शकतो हे लक्षात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने नवीन-नवीन उपक्रम सुरू केले आणि त्याचा चांगला परिणाम दिसून आला. ग्रंथालय, पुस्तकं आणि तिथलं वातावरण या सगळ्या गोष्टी वेगळ्याच वातावरणात नेणाऱ्या असतात. हे सगळं करताना मिळणारं समाधान आणि आनंद शब्दांत सांगता येणं मुश्कील आहे.

**प्र. एकुणातच तुमच्या या वाचन चळवळीविषयी काय सांगाल?**

मानवी संस्कृतीचं प्रगल्भ प्रतीक म्हणजे 'पुस्तक'. सगळ्या प्रकारचं ज्ञान समाजापर्यंत पोहोचवण्याचं साधन म्हणजे ग्रंथालय. ग्रंथमैत्रीचे लाभार्थी जेवढे वाढतील तेवढं ते ज्ञान संस्कृतीला आणि समाज समृद्धीला उपयुक्त ठरेल. वाचनामुळे देशप्रेम, इतरांना सहकार्य, एकतेची भावना वाढेल. समाजकार्य करावं असं विद्यार्थ्यांना वाटेल.

उत्तम विचारांचं, उत्तम दर्जाचं वाचन केल्यामुळे स्वत:मधल्या जाणिवा

विकसित व्हाव्यात, दोष काढून टाकावेत, डोळ्यांसमोर आदर्श ठेवून त्याप्रमाणे आपण बनावं यासाठी व्यक्ती प्रयत्न करते. साहजिकच वृत्तीत चांगला बदल होतो. सृजनता, संवेदनशीलता, समभाव वृत्तीमध्ये रुजतात.

या वाचन चळवळीच्या कामामध्ये ग्रंथालायाबरोबरच मुख्याध्यापक आणि सगळ्या अध्यापकांचं सहकार्य लाभतं. सगळ्यांनी मिळून पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न नेहमीच केला जातो. समाजामध्ये वाचनाचं महत्त्व पटवावं, वाचनालयं सुरू करावीत, समाज प्रबोधन व्हावं, यासाठी संघटना उभी करावी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या देशबांधवांचा विचार करावा यासाठीच हा सगळा प्रपंच.

सर्वसामान्य वाचक विद्यार्थ्याला वाचकवीर बनवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या, वाचन संस्कृतीची मुळं शिक्षक पालक विद्यार्थी यांच्यामध्ये रुजवण्यासाठी धडपडणाऱ्या माधुरीताई म्हणजे चालतं बोलतं ग्रंथालयच. ग्रंथालयामध्ये गेल्यावर नेहमीच प्रसन्न मुद्रेने स्वागत करून ताई जेव्हा नवीन पुस्तकांबद्दल भरभरून बोलत असतात, तेव्हा आम्हा शिक्षकांचाही उत्साह वाढतो. एखाद्या पुस्तकाबद्दल त्यांच्याशी सकस चर्चा होते तेव्हा नेहमीच ज्ञानात भर पडते. विद्यार्थीसुद्धा आता नवीन गोष्टी, गाण्यांची मेजवानी मिळणार म्हणून खुश असतात आणि त्यामुळे आतुरतेने माधुरीताईंच्या तासाची वाट बघतात.

**तुमच्याबद्दल विद्यार्थ्यांना, अध्यापकांना वाटणारा आदर आणि प्रेम वाढो आणि तुमची ही वाचन चळवळ वृद्धिंगत होवो. वाचनाचं हे कार्य नक्कीच समाज प्रबोधन घडवून आणेल. तुमच्या ह्या वाचन चळवळीला खूप खूप शुभेच्छा. धन्यवाद.**

**शब्दांकन – सौ. अक्षता ओंकार केळकर**

**Email ID - akshata.kelkar28@gmail.com**

| अंक | वर्ष | महिना | लेख | लेखक |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१ | नोव्हेंबर | मनुष्यघडणीची प्रयोगशाळा | प्रा. विवेक पोंक्षे |
| १ | २०२१ | नोव्हेंबर | भावनिक बुद्धिमत्तेच्या समृद्धीसाठी | वाच. सुजला वाटवे |
| १ | २०२१ | नोव्हेंबर | ध्यास प्रयोगशीलतेचा | सौ. विद्याताई बापट |
| २ | २०२१ | डिसेंबर | प्रेरणांचा ऊर्जास्त्रोत | वाच. सुजला वाटवे |
| २ | २०२१ | डिसेंबर | दैनंदिन जीवनातील कलेचा आस्वाद | प्रा. वैकुंठ सरदेसाई |
| २ | २०२१ | डिसेंबर | Designing E-lessons Plans | डॉ. नीरजा दशपुत्रे |
| ३ | २०२२ | जानेवारी | Critical Thinking | सौ. सविता वि. कुलकर्णी |

| अंक | वर्ष | महिना | लेख | लेखक |
|---|---|---|---|---|
| ३ | २०२२ | जानेवारी | Technology Enhanced Teaching Learning : Bloom's taxonomy and Blended learning | मधुरा लुंकड |
| ४ | २०२२ | फेब्रुवारी | बहुविध कौशल्य विकसनासाठी कार्यक्रम अर्थात पुस्तकाबाहेरील शिक्षण | श्री. बालाजी बाबुराव जाधव |
| ४ | २०२२ | फेब्रुवारी | अध्यापनातील सर्जनशीलता | डॉ. धनश्री बाम |
| ४ | २०२२ | फेब्रुवारी | अवगुण सोडिता जाती । उत्तम गुण अभ्यासता येती । | चारुता पुराणिक |
| ५ | २०२२ | जून | दूरस्थ कलाशिक्षण | सौ. शीतल कापशीकर |
| ५ | २०२२ | जून | रवीन्द्रनाथांची शाळा | प्रा. चारुता पुराणिक |
| ६ | २०२२ | जुलै | यंत्रज्ञ पूजन | शीतल कापशीकर |
| ६ | २०२२ | जुलै | AUTOMATA : Mechanical Toys for the Classroom | रविंद्र गोडबोले |
| ७ | २०२२ | ऑगस्ट | उच्च बौद्धिक क्षमता असणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य / निरामयता (Psychological well being) भाग १ | डॉ. धनश्री सोवनी |
| ७ | २०२२ | ऑगस्ट | संग्रह प्रकल्प – साधन निर्मिती | राजेश पाटील |
| ७ | २०२२ | ऑगस्ट | शैक्षणिक वातावरण समृद्धीसाठी पालक भेटी | ओंकार बाणाईत |
| ८ | २०२२ | सप्टेंबर | समाजदर्शन–सोलापूर शहरातील सहकारी संस्थांचा परिचय | सौ. प्रविणा प्रसाद जोशी |
| ८ | २०२२ | सप्टेंबर | शिक्षणवारी | विनायक माळी |
| ८ | २०२२ | सप्टेंबर | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य/ निरामयता – भाग २ | डॉ. धनश्री सोवनी |
| ९ | २०२२ | ऑक्टोबर | आले विद्यार्थ्यांच्या मना | डॉ. हेमा होनवाड |
| ९ | २०२२ | ऑक्टोबर | प्रा. मनोहर राईलकर – एक उत्साहाचा आणि ज्ञानाचा झरा | सौ. अपर्णा लळिंगकर |
| ९ | २०२२ | ऑक्टोबर | गणित म्हणजे काय? – प्रा. राईलकर पुस्तिकेबद्दल चिंतन | नागेश मोने |
| १० | २०२२ | नोव्हेंबर | गतीचं मर्म | सौ. मेघना जोशी |
| १० | २०२२ | नोव्हेंबर | अक्षरमुद्रा – पुस्तक परिचय | सौ. ऋतुजा देशमुख |
| १० | २०२२ | नोव्हेंबर | माझी पीएच.डी.ची प्रक्रिया | डॉ. धनश्री सोवनी |

**शैक्षणिक उपक्रम संशोधिका,**
**ज्ञान प्रबोधिनी**
पत्ता : 'विनायक भवन', ५१४, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरभाष : ०२०–२४२०७२३१ / २४२०७१९४